**नि. फौ.ख .नं. ४७/२०२४**

म. सरकार वि. अभिजीत संभाजी पाटील

**निशाण नं. १२ /क**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२</u>**

| | |
|---|---|
| नाव | – संदीप महिपती माळवी |
| वय | – ३५ वर्षे |
| व्यवसाय | – पोलीस पाटील पुशिरे तर्फे ठाणे |
| पत्ता | – पुशिरे तर्फे ठाणे ता. पन्हाळा जि. कोल्हापूर |

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील सौ. डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१. हे म्हणणे खरे आहे की, दि. २८.०९.२०२३ रोजी मला पोलिसांनी पंचनामा करण्याकरिता बोलविले होते. त्यावेळी तेथे दुसरे पंच शंकर मोरे हे देखील उपस्थित होते. पोलीस स्टेशनला बोलवून आम्हाला माहिती दिली. पोलिसांनी आम्हाला ध्वनीक्षेपक यंत्र दाखविले व ते कसे चालवायचे याबाबत देखील माहिती दिली. त्याची आम्ही प्रिंट काढली व ते व्यवस्थित चालत असल्याबाबत खात्री केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशन येथे माहिती घेवून त्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर अनु क्र. २ वर माझी सही आहे. त्यास **<u>नि. १३</u>** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेल्या प्रिंटवर माझी सही आहे. मला दाखविण्यात आलेल्या प्रिंटवरील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. १४</u>** देण्यात येत आहे.

२. हा पंचनामा झाल्यानंतर आम्ही कोडोली गावात गेलो. तेथे बऱ्याच गणपती मंडळांची मिरवणूक सुरु होती व तेथे मोठया आवाजात डॉल्बी लावण्यात आलेला होता तेथे लाइटिंग होती तेथे लोक मिरवणूक पाहण्याकरिता जमलेले होते. तेथे मी माझ्यासह दुसरे पंच शंकर मोरे, कृष्णात पाटील, नरेंद्र पाटील आणि इतर पोलीस स्टाफ असे गेलो होतो. आम्ही तेथे गेल्यानंतर पाहिले मिरवणूक सुरू होती. तेथे आम्ही गेल्यानंतर पोलिसांनी संबंधित गणपती मंडळ यांना आवाज कमी करा असे

सांगितले होते मात्र त्यांनी ते ऐकले नाही त्यानंतर कृष्णात पाटील यांनी मशीन बाहेर काढले व त्यांनी तेथे असलेला आवाज हा तपासणी केला. त्यानंतर मशीनमधून त्याची प्रिंट काढली. त्यावेळी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना बोलविण्याचा प्रयत्न केला पण ते आले नाही व त्यांनी प्रिंट घेतली नाही. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. १५** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेली प्रिंट तीच आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. १६** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेल्या पंचनामा व प्रिंट मधील मंडळ हे महाराणा प्रताप तरुण मंडळ कोडोली हे होते. त्यांच्या आवाजाची तीव्रता ही १०९.०५ एवढे डेसीबल होती. मंडळाच्या कार्यकर्ता यांना मी पाहिलेले होते. मी त्यांना आता पाहिल्यास ओळखू शकणार नाही कारण त्यावेळी बरेच लोक हजर होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. आर. एच. पाटील यांचेमार्फत सुरु,**

३. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा किती वाजता सुरु झाला व किती वाजता संपला हे मला निश्चितपणे सांगता येणार नाही. माझे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. मी सन २०१६ पासून पोलीस पाटील म्हणून काम करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावामध्ये एखादी गणपती अथवा शिवजयंती तसेच इतर उत्सवाकरिता मिरवणुक होत असेल तर त्या ठिकाणी हजर राहणे हे माझे काम आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातील मिरवणुक सुरु झाल्यापासून गणपती येताना तसेच विसर्जन होताना जर एखाद्या ठिकाणी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असेल तर अशा वेळी आम्ही पुर्ण वेळ हजर राहतो. माझ्या माहितीनुसार दि. २८.०९.२०२३ हा गणपती विसर्जनाचा दिवस होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी आमच्या गावात एखाद दुसरी मिरवणुक सुरु होती. त्या दिवशी मी गावातील मंडळांना माहिती देवून माझ्या कामाकरिता निघून गेलो होतो. मला त्या दिवशी नरेंद्र पाटील यांनी मला बोलविले होते म्हणून मी गेलो होतो. त्यांनी मला किती वाजता फोन केला हे मला आठवत नाही. त्या दिवशी पोलीस स्टेशन येथे मी जायच्या अगोदर दुसरा पंच तेथे आला होता किंवा कसे याबाबत मला कल्पना नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझे समक्ष पोलीस स्टेशन येथे पंचनामा केला व त्यावर माझ्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझी कोर्टामध्ये यापूर्वी साक्ष झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस मला वारंवार पंचनाम्याकरिता बोलवतात. हे म्हणणे खरे आहे की, तेथे गणपती मंडळे लागून लागून होती. तसेच अंधार असल्यामुळे मला त्यांची संख्या निश्चित सांगता येणार नाही. परंतु माझ्या माहितीनुसार तेथे आठ ते दहा मंडळे उपस्थित होती. हे म्हणणे खरे आहे की, तेथे असलेल्या मंडळांचे नाव, मंडळांचे अध्यक्ष कोण यांची माहिती मला सांगता येणार नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळी पोहोचलो होतो तेव्हा सर्व मंडळांचे लाइटिंग व डॉल्बी सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सर्व मंडळांचे डॉल्बी सुरु असताना नरेंद्र पाटील व कृष्णात पाटील यांनी यंत्राच्या सहाय्याने तपासणी केली. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी एकूण पंचनामे केले याची मला निश्चित माहिती सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की ,पोलिसांनी मला पंचनामा कसल्या पद्धतीचा आहे हे सांगितले नव्हते. माझ्या म्हणण्यानुसार डॉल्बी मोठा आवाज लावला म्हणून पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी न जाता केवळ पोलीस स्टेशन येथेच पंचनाम्यावरती सहया केल्या आहेत.

६. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी निश्चित घटनास्थळी किती वेळा गेलो हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे समक्ष काढली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वर ओळखलेली प्रिंट ही संगणकीकृत आहे. हे म्हणणे खरे आहे की, या प्रिंटमधील सर्व जागा भरलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, प्रिंटमधील सर्व जागा का भरलेल्या नाहीत त्याची माहिती मला सांगता येणार नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, मी जेव्हा सही केली होती तेव्हा मजकूर हा अपुराच होता. हे म्हणणे खरे आहे की, सही करण्यापूर्वी मी पोलिसांना कशावरती सही करतो हे विचारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ओळखलेली प्रिंट कोठे काढली कोणी काढली याबाबतची माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील फिर्याद कोणी दाखल केली याबाबत मला माहिती नाही. पंचनाम्यातील मजकूर मी सांगितला पोलिसांनी तो लिहिला असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर मी सही पाहून केली होती.

८. माझ्या गावातील मिरवणुक ही अंदाजे १० पर्यंत सुरु होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद सरकारी पक्ष यांना मदत करण्याच्या हेतूने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र शासनाने आमची नेमणुक केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावामध्ये कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाला असेल तर त्याबाबत पोलिसांना तात्काळ कळविणे, पोलिसांना सहकार्य करणे व गावामध्ये देखरेख करणे या गोष्टी माझ्या कर्तव्याच्या आहेत. माझ्या गावात गणपतीची १३ ते १४ मंडळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर गणपती मंडळांच्या बाबतीत कोणताही कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण होवू नये याकरिता दक्षता बाळगण्याचे काम माझे आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, गणपती विसर्जनाचा दिवस हा दि. २८.०९.२०२३ त्या दिवशी होता. हे म्हणणे खरे आहे की, गावातील विसर्जन मिरवणुकांवरती लक्ष ठेवण्याची जबाबदारी माझेवर होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी गावातील विसर्जन मिरवणुकांवर मी लक्ष ठेवून होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला यंत्र व इतर गोष्टी दाखविल्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये पंचनाम्यात नमूद केले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनमध्ये आम्हाला त्या यत्रांबाबतचा डेमो दाखविला तसेच डेसीबल मोजले हे देखील पंचनाम्यामध्ये नमूद करण्यात आले होते. सदर पंचनाम्यामध्ये आम्ही चाचणी पंचनामा हा पोलीस स्टेशनमध्ये पूर्ण केला होता असा मजकूर का नमूद नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा तयार केला आणि त्यावर सही केली असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, चाचणी पंचनामा हा एकाचा वेळेला करण्यात आला होता.

१०. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी एकच पंचनामा एकाच मशीनद्वारे करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या ध्वनीक्षेपक यंत्राबाबतचा तांत्रिक तज्ञ नाही. हे म्हणणे खरे आहे की,

पावतीवर काय काय मजकूर नमूद आहे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळी सर्व गणपती मंडळांचे वाद्य, ध्वनीयंत्रणा सुरु असल्याचे पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पंचनाम्यामध्ये डॉल्बी असा शब्द नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा तसेच प्रिंटमध्ये वाहनाचा क्रमांक नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, कसली ध्वनी यंत्रणा होती ते पंचनामा अथवा प्रिंटमध्ये नमूद नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये यूजर नेम तसेच त्याबाबतची सही देखील नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी कोणत्या मंडळाचे डेसीबल कोणते घेतले होते ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी बरीच मंडळे असल्यामुळे कोणत्या मंडळाची आवाजाची तीव्रता किती होती हे निश्चितपणे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या मंडळाची आवाजाची तीव्रता ही जास्त होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये डॉल्बीची कंपनी तसेच डॉल्बी मशीनचे वर्णन नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांचा आमच्याशी वरचेवर संबंध असतो. हे म्हणणे खरे आहे की, आमचा पगार हा देखील पोलिसांच्या शेऱ्यावर अवलंबून असतो.

१२. हे म्हणणे खरे आहे की, आमचे गावापासून कोडोली गाव हे १५ किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोडोली गावाला जाईपर्यंत मध्ये पोखले, जाखले, गिरोली, पोहाळे, केखले आणि माले ही गावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, मी वर वर्णन केलेल्या प्रत्येक गावांना वेगवेगळे पोलीस पाटील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यामध्ये आम्ही लिहीलेले डेसीबल हे चुकीचे आहेत.

१३. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही पंचनामे आम्ही करत असताना तेथे फिर्यादी हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणाचा अहवाल कोणी तयार केला तसेच याबाबतचे दोषारोपपत्र कोणी दाखल केले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही पंचनामे न करता केवळ आरोपींना अडकविण्याच्या हेतूने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही पंचनामे हे टायपिंग केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे टायपिंग पोलीस

स्टेशनलाच झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, मिरवणुकीचा कोणता मार्ग आहे तसेच त्याचा झोन कोणता आहे याची मी वरिष्ठांकडे चौकशी केली नव्हती.

१३.हे म्हणणे खरे आहे की, आम्ही चाचणी पंचनामा हा पोलीस स्टेशनमध्ये केला होता. हे म्हणणे खरे नाही की, चाचणी पंचनाम्यामध्ये डेसीबल ७४.७५ असल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, नि. १४ वरील पावती खोटी व बनावट आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. १४ वर सही आम्ही पोलीस स्टेशनमध्येच केली होती. हे म्हणणे खरे आहे की, चाचणी पंचनामा किती वाजता सुरु केला व किती वाजता पुर्ण केला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा आम्ही खोटा व बनावट केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. १६/सी वरील पावती ही खोटी व चुकीची आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-

**(के.दि.काकतकर)**

दिनांक. २२.०७.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पन्हाळा